नि. फौ. ख. क्र. **<u>०२/२०२१</u>**
सरकार वि. स्वप्नील राजेंद्र
**निशाणी १८**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : अनेष आकोश जंजाळ,
वय : ४३ वर्षे,
धंदा : शेती काम,
राहणार : विकास नगर, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

अकोट शहर पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलवले होते. पोलीसांनी मला दर्यापुर रस्त्यावर शिवाजी कॉलेजच्या मागे पंचनाम्यासाठी बोलवले होते. पोलीसांनी माझेसमक्ष भांडणाची विचारपुस करून नकाशा बनवला होता. पोलीसांनी बनवलेला नकाशा व केलेल्या लिखापढीवर मी सही केली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी १९** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲड. श्री.एस. जी. सांगोळे यांचे मार्फत —**

२. मी शेतीकाम तसेच गृहरक्षक म्हणुन काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी बहुदा अकोट शहर पोलीस ठाण्यात गृहरक्षक म्हणुन कर्तव्यावर असतो. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीस ठाण्यात कर्तव्याच्या संदर्भाने जाणे—येणे करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, अकोट

शहर पोलीस ठाण्याच्या ब—याच पोलीस कर्मचा—यांसोबत माझी चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, ए.एस. आय. संजय वाघ साहेबांसोबत माझी चांगली ओळख आहे.

३. घटनास्थळ पंचनामा मी वाचला होता व मी घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगु शकतो. घटनास्थळाच्या पुर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण भागात काय आहे हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो नाही, माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर मी न गेल्यामुळे मला त्याच्या चतु:सिमा सांगता येत नाहीत.

४. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा निशाणी १९ वरिल सह्या मी पोलीस ठाण्यात केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून आज पुरावा देण्यास आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १६.०७.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.